# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/७९५ प्र
दिनांक : 15 JUN 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेकरिता कार्यरत सुविधा केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्रांवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ.पजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना यांची माहिती प्रसिध्द करण्याबाबत.....**

संदर्भ : १. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७.१०.२०१७
२. या कार्यालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१८/७१०, दि.८ मे २०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुविधा केंद्र (Faclilitation Center) आणि प्रवेश निश्चिती केंद्र (Admission Reporting Center) निश्चित करण्याची प्रकिया सुरु आहे.

शासनाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागू केलेली आहे. सदर योजनेची संपूर्ण माहिती भित्तीफलकाच्या स्वरूपात सर्व विद्यार्थी आणि पालकांना समजणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या विभागातील सर्व सुविधा केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्रावर या योजनांची माहिती विद्यार्थी आणि पालकांच्या ठळकपणे निदर्शनास येईल् अशा पध्दतीने प्रदर्शित करण्याबाबत सर्व संबंधित सुविधा केंद्र व अर्ज निश्चिती केंद्र म्हणून नियुक्त केलेल्या संस्थांना सूचना देण्यात याव्यात असे संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते.

तथापि याद्वारे आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व सुविधा केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्रावर या योजनांची माहिती विद्यार्थी आणि पालकांच्या ठळकपणे निदर्शनास येईल् अशा पध्दतीने **सोबतचे माहितीपत्रक** प्रदर्शित करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधित सुविधा केंद्र व अर्ज निश्चिती केंद्र म्हणून नियुक्त केलेल्या संस्थांना देण्यात याव्यात. सदर सूचनेची अंमजबजावणी काटेकोरपणे करण्याबाबतही संस्थांना कळविण्यात यावे.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/ईबीसी/2018/ 2177
दिनांक :- 22 JUN 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की,तंत्रशिक्षण संचालनालयांचे वरील पत्रामधील दिलेल्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील प्रवेश प्रक्रियेकरीता कार्यरत सुविधा केद्र व प्रवेश निश्चिती केंद्रावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना यांचे सोबत जोडलेले माहिती पत्रक आपल्या संस्थेतील सुचना फलकांवर पालकांच्या ठळकपणे निदर्शनास येईल, अशा पध्दतीने प्रदर्शित करण्यांत यावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग


नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान


देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री


विनोद तावडे
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण


रवींद्र वायकर
मा. राज्य मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

➢ **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना-:-**

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. ३१ मार्च, २०१८ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे **वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापर्यंत** आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतल्यास त्यांना शैक्षणिक व परीक्षा शुल्काच्या **५० टक्के शिष्यवृत्ती** म्हणून अदा करण्यात येईल.

➢ **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना-:-**

- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. २२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना, **प्रतिवर्ष रु.३०,०००/-** व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना, **प्रतिवर्ष रु.२०,०००/-** इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महीन्यांसाठी अनुज्ञेय राहील. तसेच,
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित,) **वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापर्यंत** असल्यास, महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना **प्रतिवर्ष रु.१०,०००/-** व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना, **प्रतिवर्ष रु.८,०००/-** इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महीन्यांसाठी अनुज्ञेय राहील.

(वरील दोन्ही योजनांचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील)

(वरील दोन्ही योजनांचा लाभ सुलभ पध्दतीने व तात्काळ अदा करता यावा, याकरिता मंजुर रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.)

❖ **टिप** :- वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. पात्रतेचे निकष व अधिक माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.